**महाराष्ट्र शासन**

**<u>आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.</u>**

वाचले:- १) या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक १५.९.९८

२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक १३.७.९९

---

**<u>परिपत्रक</u>**

क्रमांक:- सीएलआर ११९७/५-ब

मुंबई, १४ फेब्रुवारी २००१

उपरोक्त क्रमांक १ च्या परिपत्रकाच्या मुद्दा क्रमांक ३ अन्वये देशी दारु नमुना घेण्याची पध्दत विहीत करण्यात आली आहे. सदर पध्दतीत अंशतः बदल करुन पुढीलप्रमाणे सुधारीत सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मुद्या क्रमांक ३: नमुना घेण्याची पध्दत**

**(एक)** संदर्भिय परिपत्रकात ३७५ मि.लि.च्या चार बाटल्या नमुना काढण्याची पध्दत विहीत केली आहे. सदर पध्दत रद्द करुन आता सिलबंद बाटलीतून नमुना काढल्यास ३७५ मि.ली ऐवजी १८० मि.ली. चे चार नमुना काढण्यात यावेत.

**(दोन)** सीएल-३ अनुज्ञप्तीमधून किरकोळ विक्रीसाठी उघडलेल्या बाटलीतून नमुना घ्यावयाचा झाल्यास किमान ३० मि.ली. मद्य प्रयोगशाळेत पाठविण्यासाठी नमुना काढण्यात यावा. असा नमुना काढून काही मद्य शिल्लक राहील्यास त्याचे प्रत्येकी ३० मि.ली. किंवा त्यापेक्षा कमी मद्य शिल्लक असल्यास उर्वरित मद्याचे समान दोन भाग करुन एक भाग नमुना काढणा-या अधिका-याकडे ठेवून दुसरा भाग अनुज्ञप्तीधारकास हस्तांतर करण्यात यावा. अशा प्रकारे तीन नमुने घेऊनही मद्य शिल्लक राहील्यास त्याचा चौथा ३० मि.ली. पर्यत नमुना घेण्यात यावा व तोसुध्दा प्रयोगशाळेस पाठवावा. चौथा नमुना घेतल्यास प्रयोगशाळेकडे दोन नमुने पाठवावेत अन्यथा नाही.

**(तीन)** नमुन्यांच्या चार बाटल्या घेण्यात आल्यास व सदर नमुन्याच्या तपासणीत आढळलेली तीव्रता संबंधित अनुज्ञप्तीधारकास मान्य नसल्यास प्रयोगशाळेकडील शिल्लक नमुन्यांचे

पृथःकरण सध्या विहीत केलेल्या पध्दतीनुसार अनुज्ञप्तीधारकाच्या उपस्थितीत करण्यात येईल. मात्र त्याचे शुल्क सध्याच्या रुपये ३००/- ऐवजी रु.४००/- राहील.

**(चार)** ३० मि.ली.चा घेतलेला नमुना G.L.C.(Gas Liquid Cromotograph) वर तपासावा लागल्यास त्याचे शुल्क सध्याच्या रु. १५०/- ऐवजी रु.२००/- राहील.

२. संदर्भिय परिपत्रक क्रमांक २ च्या द्वारे सीएल-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकाकडील नमुने अन्न व औषध नियंत्रण प्रयोगशाळेकडे पाठविण्याची पध्दत विहीत केली आहे. सदर पध्दतीत अंशतः बदल करुन खालीलप्रमाणे सुधारीत पध्दत विहीत करण्यात येत आहे.

**(एक)** सीएल-३ अनुज्ञप्तीमधून किरकोळ देशी दारुचे ३० मि.ली. चे घेतलेले नमुने हाफकिन प्रशिक्षण संस्थेच्या प्रयोगशाळेकडे पाठविण्यात यावेत.

**(दोन)** मात्र सिलबंद बाटल्यातून १८० मि.ली. च्या परिमाणाचा घेतलेला नमुना सध्या प्रमाणे अन्न व औषध नियंत्रण प्रयोगशाळेकडे पाठविण्यात यावा.

३. सर्वांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, अन्न व औषध नियंत्रण प्रयोगशाळेने एक दिवसांत नमुने तपासून घेण्यात येत असल्याचे कळविले आहे.

आनंद भी. कुलकर्णी
( आनंद भी.कुलकर्णी )
आयुक्त
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी यांस सस्नेह.

२) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

४) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, वांद्रे

५) संचालक औषध नियंत्रण प्रयोगशाळा,३४१ वांद्रे कुर्ला संकुल, महाराष्ट्र राज्य,वांद्रे(पूर्व) मुंबई.

७) संचालक, हाफकिन प्रशिक्षण संस्था, आचार्य दोंदे मार्ग,परळ, मुंबई-१२

८) सर्व सीएल-१ अनुज्ञप्तीधारक

९) या कार्यालयाचे सर्व कार्यासन अधिकारी.

१०) या कार्यालयाचे कार्यासन क्रमांक १२ अभिलेख शाखा (५ प्रती)

(CL-Namuna) Iwp Vandana १३.२.२००१